15 MAY 2023

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठ अध्यासनाला मिळतेय ऊर्जितावस्था

## स्वनिधीतून अध्यासन केंद्रांना अनुदान : राज्य सरकारने अनुदान देण्याची विद्यापीठ प्रशासनाची अपेक्षा

अहिल्या परकाळे
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील बहुतांश अध्यासनासह अभ्यास केंद्रांना युजीसीकडून मिळणारे अनुदान बंद झाले आहे. त्यामुळे विद्यापीठ स्वनिधितून अध्यासन केंद्रांना अनुदान देत केंद्रांमध्ये संशोधनाचे कार्य अविरतपणे सुरू ठेवले आहे. विद्यापीठाने अध्यासन केंद्रांना उर्जितावस्था दिली असली तरी राज्य शासनाने अनुदान देवून अभ्यास केंद्रांचा नावलौकिक वाढवावा, अशी अपेक्षा शिक्षण क्षेत्रातून व्यक्त होत आहे.

अध्यासनाच्या माध्यमातून संशोधन करण्यासाठी युजीसीकडून अनुदान दिले जाते. युजीसीचे अनुदान बंद झाल्यानंतर राज्य शासनाने अभ्यास केंद्रांना अनुदान द्यायचे असते, हा नियम आहे. परंतू विद्यापीठाने सातत्याने प्रयत्न करूनही अद्याप पुरेसा निधी शासनाकडून दिला जात नाही. सातत्याच्या पाठपुराव्यामुळे एक वर्षापूर्वी १० कोटींचा निधी सरकारने दिला असला तरी, तो सर्वच केंद्रांसाठी दिलेला नाही. त्यामुळे पंडीत नेहरू, महात्मा गांधी, छत्रपती शाहू महाराज मराठा, संत तुकाराम, अहिल्यादेवी होळकर, विठ्ठल रामजी शिंदे, लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यासह अन्य अध्यासनांना शासन अनुदानाची गरज आहे. विद्यापीठ प्रशासनाने राज्य शासनाकडे प्रस्ताव पाठवूनही शासनाने अद्याप दखल घेतलेली नाही.

विद्यापीठ प्रशासन स्वनिधितून अध्यासन चालवत आहे, ही स्वागतार्ह गोष्ट आहे. परंतू सर्वच अध्यासनाला न्याय द्यायचा असल्याने खर्चावर शेवटी मर्यादा पडतातच. तरीही विद्यापीठ प्रशासन सर्वच अध्यासन केंद्रांना न्याय देत संशोधन वाढवण्याचा पुरेपूर प्रयत्न करीत आहे.

### विद्यापीठ प्रशासनाकडून सातत्याने पाठपुरावा

विद्यापीठातील महावीर जैन अध्यासन, गोडबोले अध्यासन, श्रीमती शारदाबाई अध्यासन, विठ्ठल रामजी शिंदे अध्यासनाला विद्यापीठासह लोकवर्गणीतून भरपूर निधी मिळतो. त्यामुळे या अध्यासनांचे सखोल संशोधन सुरू आहे. तसेच महावीर अध्यासनाच्या नवीन इमारतीसाठी जैन समाजातील बांधव आपआपल्या परिने मदतीचा हात पुढे करीत आहेत. भगवान महावीर जैन अध्यासनाचे नवीन बांधकाम लवकरच सुरू होण्याच्या मार्गावर आहे.



### राजर्षी शाहू महाराज संशोधन केंद्राचे संशोधन अविरतपणे

राजर्षी शाहू महाराज संशोधन केंद्राच्यावतीने मराठी, हिंदी, इंग्रजी, रशियन अशा अनेक भाषांमध्ये शाहू चरित्राचा अनुवाद केला आहे. त्यामुळे जगभर शाहूंच्या विचाराचा प्रचार आणि प्रसार होत आहे. जगभरातील सर्वच भाषांमध्ये शाहू चरित्राचा अनुवाद करण्याचा मानस ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांनी केला आहे. शाहू कृतज्ञता पर्वातही विद्यापीठाने शाहू महाराज यांच्या कार्याविषयी कृतज्ञता व्यक्त करीत रशियन आणि इटालियन भाषेत पुस्तकांचे प्रकाशन करून शाहूंना वंदन केले आहे. तसेच शाहू संशोधन केंद्रात सातत्याने संशोधन कार्य सुरू असल्याने या केंद्राला देश-विदेशातील संशोधकांनी भेटी देवून संदर्भग्रंथांचा वापर संशोधनासाठी करतात.

### शासनाने अध्यासनाला अनुदान द्यावे

लोकनेते बाळासाहेब देसाई यांच्यासह अन्य एका अध्यासनाला सरकारने अनुदान दिले आहे. काही अध्यासनाला देणग्या मिळतात, तर काही अध्यासनाला देणग्या अपुऱ्या आहेत. त्यामुळे स्वनिधीतून विद्यापीठ अध्यासनात संशोधनाचे कार्य करीत आहे. परंतू अध्यासनाचा मुख्य उद्देश साध्य करण्यासाठी राज्य शासनाने किंवा अन्य देणगीच्या माध्यमातून निधी उपलब्ध होणे गरजेचे आहे.

– डॉ. व्ही. एन. शिंदे (प्रभारी कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ)

15 MAY 2023

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## ‘चौपाल’ गोलमेज परिषदेत निर्धार; पर्यावरण चळवळीतील विविध संस्थांचा सहभाग

# विकासासाठी नियोजनबद्ध पावले टाकूया

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १४ : शासन आणि प्रशासनातील यंत्रणेशी योग्य समन्वय साधून पाणी, वृक्ष संवर्धन, प्लास्टिक कचरा निर्मूलनासह कोल्हापूरच्या शाश्वत विकासासाठी नियोजनबद्ध पाऊल टाकण्याचा निर्धार पर्यावरण संरक्षण चळवळीतील विविध १८ संस्था-संघटनांच्या प्रतिनिधींनी रविवारी केला. ‘चौपाल’ गोलमेज परिषदेत त्यांनी एकत्रितपणे पर्यावरण संवर्धन, शाश्वत विकासाचे ध्येय, कृती आराखडा ठरवून सामूहिकपणे कार्यरत राहणे आणि त्याचा आढावा, पुढील वाटचाल निश्चितीसाठी दर तीन महिन्यांनी गोलमेज परिषद घेण्याचे ठरविले.

‘सेतू’ कोल्हापूर आणि पूर्णम इकोव्हिजन फौंडेशनतर्फे शिवाजी विद्यापीठातील अतिथीगृहात गोलमेज परिषद घेण्यात आली. या परिषदेचे




कोल्हापूर : ‘चौपाल’ गोलमेज परिषदेत सहभागी प्रतिनिधींनी कोल्हापूरच्या शाश्वत विकासासाठी नियोजनबद्ध पाऊल टाकण्याचा निर्धार केला. जिल्हाधिकारी राहुल रेखावार यांच्या प्रमुख उपस्थितीत परिषदेचा समारोप झाला.

उद्घाटन प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्या हस्ते जांभूळ, सीताफळ बीजरोपणाने झाली. या वेळी जलतज्ज्ञ अनिलराज जगदाळे, पर्यावरणतज्ज्ञ उदय गायकवाड, वन्यजीव अभ्यासक सुहास वायंगणकर, ‘निसर्गमित्र’चे अनिल चौगुले प्रमुख उपस्थित होते.

सर्वांनी स्वकेंद्रित विचार सोडून निसर्गकेंद्री विचार करायला हवा, तरच आपला शाश्वत विकास होईल. टाकाऊपासून टिकाऊ संकल्पनेवर आधारित प्रकल्प राबवून रोजगारनिर्मिती करणे आवश्यक असल्याचे डॉ. शिंदे यांनी सांगितले. पर्यावरणविषय सर्वांनी समजून घ्यावा. त्याबाबत सर्वांगीण विचार करण्याचे आवाहन जगदाळे यांनी केले. कोल्हापुरातील पाण्याच्या स्रोतांचे मॅपिंग करून त्यांचे प्रमाणीकरण करायला हवे. घरातून बाहेर पडणाऱ्या पाण्याचा पुनर्वापर गरजेचा आहे. त्याबाबत काम होणे आवश्यक असल्याचे गायकवाड यांनी सांगितले.

या परिषदेचा समारोप जिल्हाधिकारी राहुल रेखावार यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला. पर्यावरण रक्षण हा सार्वजनिक धोरणाचा विषय आहे. लोकांपर्यंत जावून त्यांचे मतपरिवर्तन करून त्यांना पर्यावरण संवर्धन, शाश्वत विकासात सहभागी करून घेणे आवश्यक आहे. सर्व चांगल्या उपक्रमांना प्रशासनाची साथ राहील. प्रशासन आणि सामाजिक संस्थांनी एकत्र येऊन काम केल्यास कोल्हापूरचा विकास निश्चितपणे होईल, असे जिल्हाधिकारी रेखावार यांनी सांगितले.

या परिषदेत स्नेहल सप्रे (सेतू), आशिष कोंगळेकर (कोल्हापूर अर्थ वॉरिअर्स), जयश्री गंगाधरे (वनमित्र संस्था कागल), सागर बकरे (ग्रामविकास फौंडेशन), पराग केमकर (निसर्गमित्र संस्था), प्रसाद वालावलकर (सोलर पॉवर), वर्षा वायचळ, जयश्री कजारिया (गार्डन्स क्लब), गुणकली भोसले (निसर्ग संवर्धन संस्था), अजय कोराणे (असोसिएशन ऑफ आर्किटेक्ट अँड इंजिनिअर्स), गोपाल खंडेलवाल, अमोल बुड्ढे (वृक्षप्रेमी संस्था), संदीप चोडणकर (चला नदी जाणूया), प्रतिभा ठोंबरे (सिद्धगिरी मठ), प्रशांत पाटील, माजी नगरसेवक अजित ठाणेकर, स्नेहल कारेकर, दीपक शिरोडकर, सुहास बट्टेवार, तानाजी भोसले, ऋत्विज पावसकर, नीता वालावलकर आदी उपस्थित होते. ‘सेतू’चे संचालक शशांक देशपांडे यांनी प्रास्ताविक केले. तृप्ती देशपांडे यांनी सूत्रसंचालन केले. अभिजित कुलकर्णी यांनी आभार मानले.

### कोण, काय, म्हणाले?

- सुहास वायंगणकर : कोल्हापूरच्या जैवविविधतेचा अभ्यास करून त्यानुसार संवर्धन, प्रशिक्षण केंद्र वाढवावीत.
- संदीप चोडणकर : उगम ते संगमापर्यंत लक्ष देऊन नदीपात्राचा विचार करून विकास करावा.
- अनिल चौगुले : शासनाने पर्यावरण संबंधित कौशल्य विकास कार्यक्रम वाढवावेत.

15 MAY 2023

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# प्रशासन-सामाजिक संस्थांनी एकत्र येऊन काम केल्यास कोल्हापूरचा विकास निश्चित : रेखावार

## सी २० अंतर्गत पर्यावरण क्षेत्रात कार्यरत संस्थांची गोलमेज परिषदेला प्रतिसाद

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** प्रशासन-सामाजिक संस्थांनी एकत्र येऊन काम केल्यास कोल्हापूरचा विकास निश्चित होईल, असे मत जिल्हाधिकारी राहुल रेखावार यांनी रविवारी व्यक्त केले.

सेतू संस्था, कोल्हापूर आणि पूर्णम इकोविजन फाउंडेशन, पुणे यांच्या वतीने रविवारी शिवाजी विद्यापीठाच्या प्रांगणात झालेल्या चौपाल गोलमेज परिषदेत ते बोलत होते. ते म्हणाले, सर्व चांगल्या उपक्रमांना प्रशासनाची साथ असेल. पर्यावरणातील वेगवेगळ्या विषयांचे प्रशिक्षण घेऊन आपण त्या विषयांमध्ये भरीव कामगिरी करूया, असे आवाहन त्यांनी केले.

पर्यावरणपूरक जीवनशैली आणि कोल्हापूरचा शाश्वत विकास हा मुख्य उद्देश असलेल्या या परिषदेचे उद्घाटन विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव प्रा. डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या हस्ते झाले.




**शिवाजी विद्यापीठात आयोजित चौपाल गोलमेज परिषदेत रविवारी जिल्हाधिकारी राहुल रेखावार यांचे अजित ठाणेकर यांनी स्वागत केले. यावेळी शशांक देशपांडे, अनिल चौगुले, स्नेहल सप्रे उपस्थित होते.**

भौतिक विकासाचा विचार न करता पर्यावरणपूरक जीवनशैली अंगीकारल्यास खरा विकास होईल, असे मत शिंदे यांनी व्यक्त केले.

प्रास्ताविक सेतू संस्थेचे शशांक देशपांडे यांनी केले. संस्थेची माहिती स्नेहल सप्रे यांनी दिली. तृप्ती देशपांडे यांनी सूत्रसंचालन केले. अभिजित कुलकर्णी यांनी आभार मानले.

या परिषदेत १८ संस्थांचे प्रतिनिधी सहभागी झाले होते. कोल्हापूर अर्थ वॉरियर्सचे आशिष कोंगळेकर, वनमित्र संस्था, जयश्री गंगाधरे, वृक्षप्रेमी संस्थेचे अमोल बुढ्ढे, व्हीजन इचलकरंजीचे गोपाल खंडेलवाल, निसर्ग संवर्धन संस्थेच्या गुणकली भोसले, प्रतिभा ठोंबरे, ग्रामविकास फाउंडेशनचे सागर बकरे, आधार फाउंडेशनचे प्रशांत पाटील, असोसिएशन ऑफ आर्किटेक्चर अँड इंजिनिअर्सचे अजय कोराणे, निसर्गमित्र संस्थेचे पराग केमकर, पंचगंगा अमृतवाहिनी नदी संकल्प समितीचे संदीप चोडणकर, गार्डन क्लबतर्फे वर्षा वायचळ आणि जयश्री कजारिया यापर्यावरण क्षेत्रात काम करणाऱ्या मान्यवरांनी आपले शाश्वत विकासाबद्दलचे मत मांडले. माजी नगरसेवक अजित ठाणेकर यांनी प्रशासनाची मदत घेऊन चांगले काम नक्कीच उभे राहील, हा विश्वास व्यक्त केला.

विशेष मार्गदर्शक प्रा. अनिलराज जगदाळे, सुहास वायंगणकर, उदय गायकवाड, अनिल चौगुले यांनीही मार्गदर्शन केले. या परिषदेसाठी स्नेहल कारेकर, दीपक शिरोडकर, सुहास बट्टेवार, तानाजी भोसले, ऋत्विज पावसकर नीता वालावलकर यांनी परिश्रम घेतले.

जनसंपर्क कक्ष
15 MAY 2023 लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पत्रकारितेच्या पाचजणांना पीएच.डी.

## विद्यापीठात एकाच मार्गदर्शकांतर्गत एकाचवेळी पाच प्रबंध सादर

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या जर्नालिझम व मास कम्युनिकेशन विभागाच्या विभागप्रमुख डॉ. निशा मुडे-पवार यांच्या मार्गदर्शनाखाली एकाच वेळी पाच संशोधक विद्यार्थ्यांनी पीएच.डी. प्रबंध सादर केला आहे. त्यापैकी चार विद्यार्थ्यांना नुकतीच शिवाजी विद्यापीठाची पीएच.डी. पदवी जाहीर झाली. एकाच मार्गदर्शकाखाली पाच विद्यार्थ्यांनी पीएच.डी. प्रबंध सादर करण्याची विद्यापीठातील ही पहिलीच घटना आहे. याबद्दल कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांनी विभागाचे अभिनंदन केले आहे.


अनुराधा इनामदार


चंद्रशेखर वानखेडे


तानाजी पाटील


सुप्रिया शेलार


सुनीलकुमार सरनाईक

अनुराधा इनामदार यांनी कॉर्पोरेट कम्युनिकेशन इन टाटा ग्रुप-अॅन अॅनॅलिटिकल स्टडी ऑफ हायपर मार्केट स्टार बझार इन वेस्टर्न महाराष्ट्र या विषयावर, तर सुप्रिया शेलार यांनी इम्पॅक्ट ऑफ प्रिंट मीडिया ऑन पब्लिक अंडरस्टॅंडिंग ऑफ एन्व्हायर्नमेंटल इश्युज ऑफ वेस्टर्न घाट्स, महाराष्ट्र विथ रेफरन्स टू दाजीपूर वाइल्ड लाइफ सँच्युरीश या विषयावर प्रबंध सादर केला. चंद्रशेखर वानखेडे यांनी इंग्लिश जर्नालिझम इन महाराष्ट्र विथ स्पेशल रेफरन्स लोकमत टाइम्स या विषयावर तर तानाजी पाटील यांनी इम्पॅक्ट ऑफ सोशल अॅन्ड बिहेव्हरल चेंज कम्युनिकेशन ऑन रूरल सॅनिटेशन प्रोग्राम विथ स्पेशल रेफरन्स टू कोल्हापूर डिस्ट्रिक्ट या विषयावर प्रबंध पूर्ण केला आहे. विभागाचे सुनीलकुमार सरनाईक यांनाही डॉ. प्रताप पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पीएच.डी. पदवी जाहीर झाली.

जनसंपर्क कक्ष

15 MAY 2023 पुढारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ...तर कोल्हापूरचा विकास निश्चित

## जिल्हाधिकारी रेखावार यांचे प्रतिपादन; शिवाजी विद्यापीठात गोलमेज परिषद

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

सी-२० अंतर्गत पर्यावरण क्षेत्रात कार्यरत संस्थांची गोलमेज परिषद प्रशासन व सामाजिक संस्थांनी एकत्र येऊन काम केल्यास कोल्हापूरचा विकास निश्चित होईल, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी राहुल रेखावार यांनी केले.

सेतू संस्था, पूर्णम इकोव्हिजन फाऊंडेशन, पुणे यांच्यातर्फे शिवाजी विद्यापीठात 'चौपाल' या गोलमेज परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. परिषदेचे उद्घाटन प्रभारी कुलसचिव प्रा. डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या हस्ते बीजारोपणाने झाले. सर्वांनी केवळ भौतिक विकासाचा विचार न करता पर्यावरणपूरक जीवनशैली अंगीकारल्यास खरा विकास होईल, असे मत डॉ. शिंदे यांनी व्यक्त केले. परिषदेची सांगता जिल्हाधिकारी रेखावार यांच्या उपस्थितीत झाली. सर्व चांगल्या उपक्रमांना प्रशासनाची साथ असेल. पर्यावरणातील वेगवेगळ्या विषयांची ट्रेनिंग घेऊन त्या विषयांमध्ये भरीव कामगिरी करू या, असे आवाहन त्यांनी केले. प्रास्ताविक सेतू संस्थेचे सचिव शशांक देशपांडे यांनी केले. संस्थेची माहिती स्नेहल सप्रे यांनी दिली. परिषदेमध्ये १८ संस्थांचे प्रतिनिधी सहभागी झाले होते. परिषदेत सुहास वायंगणकर, उदय गायकवाड, अनिलराज जगदाळे, अनिल चौगुले यांनी विविध उपक्रमांबद्दल मार्गदर्शन केले. यावेळी कोल्हापूर अर्थ वॉरियर्सचे आशिष कोंगळेकर, निसर्ग संवर्धन संस्थेच्या गुणकली भोसले, सिद्धगिरी मठातर्फे प्रतिभा ठोंबरे, ग्रामविकास फाऊंडेशनचे सागर बकरे, असोसिएशन ऑफ आर्किटेक्ट अँड इंजिनिअर्सचे अजय कोराणे, पंचगंगा अमृतवाहिनी नदी संकल्प समितीचे संदीप चोडणकर, गार्डन क्लबतर्फे वर्षा वायचळ, जयश्री कजारिया, माजी नगरसेवक अजित ठाणेकर प्रमुख उपस्थित होते. सूत्रसंचालन तृप्ती देशपांडे यांनी केली. अभिजीत कुलकर्णी यांनी आभार मानले.

पुण्यनगरी

# अलोक जत्राटकर यांचे आज व्याख्यान

**कोल्हापूर :** कोल्हापूर युवासेनेच्या वतीने सोमवार दि. १५ रोजी महाविद्यालयीन युवा-युवतींसाठी मोफत सोशल मिडीयाच्या अति वापरामुळे हरवत चाललेले नाते संबंध या अनोख्या व गरजेच्या वस्तुस्थिती या विषयी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे.

शिवाजी विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी अलोक जत्राटकर हे व्याख्यान देणार आहेत. हा कार्यक्रम शिवाजी पेठ येथील न्यू कॉलेजमध्ये सकाळी ११ वाजता होणार आहे. या व्याख्यानासाठी युवा-युवतींनी उपस्थित रहावे असे आवाहन करण्यात आले आहे.

सकाळ



कोल्हापूर : नाईट कॉलेजमध्ये मुद्रितशोधन प्रमाणपत्र कोर्सच्या सांगता समारंभप्रसंगी बोलताना शिवाजी विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. आर. जी. पवार.

# 'मुद्रितशोधन क्षेत्रात स्वयंरोजगाराची संधी'

कोल्हापूर : मुद्रितशोधन क्षेत्रात स्वयंरोजगाराची मोठी संधी उपलब्ध आहे, असे शिवाजी विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. आर. जी. पवार यांनी सांगितले. नाईट कॉलेजच्या मराठी विभागातर्फे मुद्रितशोधन प्रमाणपत्र अभ्यासक्रमाच्या सांगता समारंभात ते बोलत होते. प्रभारी प्राचार्य डॉ. एस. जे. फराकटे अध्यक्षस्थानी होते. डॉ. पवार म्हणाले, की विद्यार्थ्यांनी आयुष्यभर निरंतर शिक्षण घेत राहावे. ज्ञान हीच शक्ती आहे. ज्ञान आणि कौशल्य असणारी व्यक्ती कर्तृत्वाचा ठसा उमटवू शकते. अखंड अध्ययन करीत राहा. डॉ. फराकटे यांनी नाईट कॉलेजमधील विविध उपक्रमांचा आढावा घेतला. डॉ. प्रशांत गायकवाड, अमित मेधावी, भरत कुंभार, सातापा माळी यांनी मनोगत व्यक्त केले. प्राचार्य श्रीधर हेरवाडे व बाजीराव जठार यांनी कोर्सला अध्यापन केले. मराठी विभागप्रमुख डॉ. अरुण शिंदे यांनी प्रास्ताविक केले. पंडित कंदले यांनी सूत्रसंचालन केले. विजय कांबळे यांनी आभार मानले.

15 MAY 2023
तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# प्रोजेक्टमधून विद्यार्थ्यांचे तांत्रिक कौशल्य समजते

## आय. क्यू. ए. सी. स्पेशल सेलचे संचालक एस. एस. माने यांचे मत

प्रतिनिधी
कोल्हापूर

विद्यार्थी ज्ञानाचा अविष्कार प्रोजेक्टव्दारे जगाला दाखवू शकतात. यासाठी विद्यार्थ्यांनी प्रोजेक्टकडे विशेष लक्ष देणे गरजेचे आहे. इनोव्हेशन म्हणजेच नाविन्यता हा गुण त्यासाठी आवश्यक आहे. इंटरव्ह्यूवेळी एच. आर विभागातील लोक खास करून प्रोजेक्टवर प्रश्न विचारतात. कारण यातून विद्यार्थ्यांचे तांत्रिक व शैक्षणिक ज्ञान समजते, असे मत आय. क्यू. ए. सी. सेलचे संचालक एस. एस. माने यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठ तंत्रज्ञान अधिविभागात 'टेक्निकल प्रोजेक्ट कॉम्पिटेशन- टेकफेस्ट २०२३' स्पर्धा आयोजित केली होती. तंत्रज्ञान अधिविभाग व रिसर्च आणि डेव्हलपमेंट फाउंडेशन यांनी इन्स्टिटयूशन्स इनोव्हेशन कौन्सिल उपक्रमांतर्गत आयोजित



**कोल्हापूर : विद्यापीठातील तंत्रज्ञान अधिविभागातील टेक्निकल प्रोजेक्ट कॉम्पिटेशन-टेकफेस्ट स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी प्रा. एस. एस. माने, डॉ. पी. डी. राऊत, डॉ. एस. एन. सपली आदी.**

स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. स्पर्धेत विद्यार्थ्यांनी ११० प्रोजेक्ट सादर केले.

विद्यापीठातील रिसर्च अॅन्ड डेव्हलपमेंट फाउंडेशनचे प्रमुख प्रा. डॉ. पी. डी. राउत म्हणाले, 'विद्यार्थ्यांच्या संशोधनाला व्यासपीठ मिळावे, प्रोजेक्टच्या पेटंटसह प्रोडक्ट व्हावे. त्यासाठीच्या प्रत्येक गोष्टीसाठी ही कंपनी मदत करते. स्टार्टअपला बळ मिळण्यासाठी शासनाने ५ कोटींचा निधी दिला आहे. निधीची कमतरता नाही. 'शार्क टँक'सारख्या उपक्रमात विद्यार्थी चमकत आहेत. युनिकॉर्न स्टार्टअपकडे त्यांची वाटचाल व्हावी.

अध्यक्षस्थानावरून बोलताना डॉ. एस. एन. सपली म्हणाले, विद्यार्थ्यांना वर्गात येण्याची गरज नाही. परंतु जे शिक्षक प्रॅक्टीकल ज्ञान देतील त्यांचे वर्ग ओसंडून वाहतील. तंत्रज्ञानात अनेक बदल होत असून त्याचा वेग प्रचंड आहे. शिक्षकांनी हे बदल अभ्यासून विद्यार्थ्यांपर्यंत पोहचवावेत व त्यांना स्वबळावर उभे राहण्यास मदत करावी.

शिवराज भोसले (सिमेन्स डिजीटल इंडस्ट्री प्रायव्हेट लि.), संदीप मिराजदार (क्रिडाई कोल्हापूर), सचिन पाटील (संस्थापक, शिवम मेम्ब्रेन प्रायव्हेट लि.), शितल पाटील (खतेंद्र मार्केटिंग प्रा. लि.) प्रा. आर. एन. कांबळे (विभागप्रमुख होम सायन्स, राजाराम कॉलेज ) व डॉ. पी. ए. कदम (सहयोगी प्राध्यापक, विद्यापीठ) यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. प्रास्ताविक प्रा. अमर डूम यांनी केले. आभार डॉ. एस. एम. लोखंडे यांनी मानले. सूत्रसंचालन आदिती रानमाळे यांनी केले. उपक्रमाचे संयोजन प्रा. अमर डूम, डॉ. डी. एस. नांगरे व समितीने केले.

तरुण भारत



अनुराधा इनामदार



सुप्रिया शेलार



सुनिलकुमार सरनाईक



चंद्रशेखर वानखेडे



तानाजी पाटील

# पत्रकारिता विभागाच्या पाच विद्यार्थ्यांना पीएचडी

प्रतिनिधी

कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या जर्नलिझम व मास कम्युनिकेशन विभागाच्या विभागप्रमुख व वरिष्ठ प्राध्यापक डॉ. निशा मुडे - पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पाच संशोधक विद्यार्थ्यांना पीएच. डी. जाहीर झाली. याबद्दल कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांनी विभागाचे अभिनंदन केले.

अनुराधा इनामदारांनी 'कॉर्पोरेट कम्युनिकेशन इन टाटा ग्रुप-ॲन ॲनॅलिटिकल स्टडी ऑफ हायपर मार्केट स्टार बझार इन वेस्टर्न महाराष्ट्र' यावर, सुप्रिया शेलारांनी 'इम्पॅक्ट ऑफ प्रिंट मिडिया ऑन पब्लिक अंडरस्टॅंडिंग ऑफ एन्व्हायर्नमेंटल इश्युज ऑफ वेस्टर्न घाट्स, महाराष्ट्र विथ रेफरन्स टू दाजीपूर वाईल्ड लाईफ सॅंच्युरीष' यावर, चंद्रशेखर वानखेडेंनी 'इंग्लिश जर्नलिझम इन महाराष्ट्र विथ स्पेशल रेफरन्स टू टाईम्स ऑफ इंडिया' यावर, तानाजी पाटील यांनी 'इम्पॅक्ट ऑफ सोशल ॲन्ड बिहेव्हरल चेंज कम्युनिकेशन ऑन रूरल सॅनिटेशन प्रोग्राम विथ स्पेशल रेफरन्स टू कोल्हापूर डिस्ट्रीक्ट' यावर प्रबंध सादर केले. सुनिलकुमार सरनाईक यांनाही पीएच.डी जाहीर झाली.

जनसंपर्क कक्ष

15 MAY 2023

तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# केआयटीमध्ये कार्यशाळा उत्साहात

- मुंबई येथील आयआयटी आणि केआयटीच्या संयुक्त विद्यमाने नियोजन

प्रतिनिधी

कोल्हापूर

केआयटीचे अभियांत्रिकी (स्वायत्त) महाविद्यालयाच्या स्थापत्य विभागामार्फत व उन्नत महाराष्ट्र अभियान विभाग व मुंबईतील जि. आय. एस. ई. हब आय. आय. टी. यांच्या संयुक्त विद्यमाने "ॲप्लिकेशन ऑफ जि. आय. एस. इन अकॅडेमिकस रीसर्च अँड डेव्हलपमेंट सेक्टर" या विषयावर तीन दिवसीय राष्ट्रीय कार्यशाळा उत्साहात पार पडली. मुंबई आय. आय. टी.मधील तज्ज्ञ डॉ. गोपाळ चव्हाण, डॉ. हेमंत बेलसरे, असीम आर. पी. प्रमुख वक्ते म्हणून मार्गदर्शन केले. उन्नत महाराष्ट्र अभियानचे मुख्य सल्लागार डॉ. मिलिंद सोहोनी आणि जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी डॉ. प्रसाद संकपाळ यांची प्रमुख उपस्थितीत कार्यशाळेचे उद्घाटन झाले.



केआयटी स्थापत्य विभागामध्ये झालेल्या "ॲप्लिकेशन ऑफ जि. आय. एस. इन अकॅडेमिक रीसर्च अँड डेव्हलपमेंट सेक्टर" कार्यशाळेत सहभागी तज्ज्ञ मार्गदर्शक, प्राध्यापक, विद्यार्थी.

कार्यशाळेसाठी विविध महाविद्यालयातील प्राध्यापक, संशोधन अभ्यासक, विद्यार्थी, विविध क्षेत्रातील उद्योजक सहभागी झाले होते.

सहभागी उपस्थितांना तज्ज्ञांमार्फत ग्रामीण भागातील विकासाचे प्रश्न आणि विविध योजनांमधील तांत्रिक अडचणी यांचा अभ्यास करून, या प्रश्नांवर मार्ग कसे काढता येतील याची माहिती दिली.

कार्यशाळेसाठी संस्थेचे चेअरमन सुनील कुलकर्णी, व्हाईस चेअरमन साजिद हुदली, सेक्रेटरी दीपक चौगुले, कार्यकारी संचालक डॉ. व्ही. व्ही. कार्जीन्नी, संचालक डॉ. मोहन वनरोट्टी, कुलसचिव डॉ. एम. एम. मुजुमदार, डॉ. आदित्य खेबुडकर यांचे मार्गदर्शन लाभले. प्रा. ओंकार सूर्यवंशी यांनी समन्वयक म्हणून काम पाहिले.

जनसंपर्क कक्ष
1 5 MAY 2023 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'कोल्हापूर ते मिरज रेल्वे' माहितीपट ठरला सर्वोत्कृष्ट

## राजर्षी शाहूंचे कार्य माहितीपटातून उलगडले

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठांच्या जर्नालिझम अँड मास कम्युनिकेशन विभागाच्यावतीने राजर्षी छत्रपती शाहू महाराज स्मृतीशताब्दी वर्षानिमित्त 'राजर्षी छत्रपती शाहू महाराज राष्ट्रीय माहितीपट महोत्सव २०२३'चे आयोजन केले होते. या महोत्सवात शाहू महाराजांच्या योगदानावर प्रकाश टाकणारे १९ माहितीपट आले होते. विजेत्या पाच माहितीपटांचे स्क्रीनिंग करण्यात आले. महोत्सवात चेतन सूर्यवंशी यांच्या 'कोल्हापूर ते मिरज रेल्वे' या माहितीपटाने प्रथम क्रमांक पटकावला. विजेत्यांना प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्या हस्ते बक्षिस देऊन सन्मानित करण्यात आले.



कोल्हापूर : पारितोषिक वितरणप्रसंगी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, डॉ. निशा पवार, विक्रम रेपे, डॉ. शिवाजी जाधव, अनुप जत्राटकर, अनमोल कोठाडिया, डॉ. सुमेधा साळुंखे, जगदीश गुरव, परशराम पवार, पारितोषिक विजेते चेतन सूर्यवंशी, समृद्धी पाटील, पल्लवी पाटील सिमरन ठाणेकर.

माहितीपट महोत्सव समृद्धी पाटील यांच्या 'साठमारी'ला द्वितीय पारितोषिक, सोनाली हुंबरे यांच्या 'मोतीबाग तालीम'ला विशेष परीक्षक पुरस्कार, उत्कृष्ट ध्वनी पारितोषिके प्राप्त झाले. सिमरन ठाणेकर यांच्या 'लक्ष्मी-विलास पॅलेस' व पल्लवी पाटील यांच्या 'विचार शाश्वत वसतिगृहांचा' उत्कृष्ट छायाचित्रण आणि उत्कृष्ट संकलन पारितोषिके मिळाली. प्र-कुलगुरू डॉ. पाटील, कुलसचिव डॉ. शिंदे यांनी मनोगत व्यक्त केले.